# कोरोना काळातही विद्यार्थ्यांना मिळणार 'ग्लोबल टच'

## IIM मध्ये PGP च्या नवीन बॅचचे स्वागत

**नागपूर, कॉमर्स रिपोर्टर.** कोरोना काळात प्रोफेशनपासून शैक्षणिक स्वरूपात मोठा बदल झाला आहे. या काळात विद्यार्थ्यांना अपडेट ठेवणे व त्यांना ग्लोबल टच मिळावा, यासाठी आयआयएम नागपूरने अनेक जागतिक विद्यापीठांशी करार केला आहे, असे माहिती आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मैत्री यांनी दिली.

पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम (पीजीपी) चे सत्र 2021-23 च्या विद्यार्थ्यांचे आज ऑनलाईन स्वागत करण्यात आले. सोबतच पहिल्या पीएचडी बॅचचेही स्वागत करण्यात आले. या बॅचमध्ये एकूण 258 असून ते देशातील 20 राज्यांमधील आहे. मैत्री यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण देण्याच्या उद्देशाने जापान, यूरोप,



कॅनडा, अमेरिका आदी विद्यापीठांशी करार केला आहे. यामुळे जगातील टॉप कार्पोरेटमध्ये कार्यरत अॅल्युमनीसुद्धा बॅचचे मार्गदर्शन करतील. त्यांनी सांगितले की, लवकर संस्थेचे नवीन कॅम्पस तयार होईल. प्रकाश अवस्थी यांनी अभ्यासक्रमाबाबत माहिती दिली. वर्षा खांडेकर यांनी नवीन बॅचचे स्वागत केले. टॉप राहिलेले विद्यार्थी दिंपी खुराना, सेवियो जोसफ, रामपा कार्तीक, सुभम महाजन, रीचा चौधरी, सौरभ भार्गव, अभिषेक बानगड, प्रगती लोहानी, समृद्धी कोली यांना सर्टिफिकेट ऑफ मेरिट देण्यात आले.